# आरोग्य सेवा आयुक्तालय

(महाराष्ट्र राज्य)

"आरोग्य भवन", सेंट जॉर्जेस रुग्णालय आवार, पी.डिमेलो रोड, मुंबई- ४०० ००१

| | | |
|---|---|---|
| कार्यालय<br>संचालक (वैयक्तिक)<br>उपसंचालक (शुश्रृषा) | दूरध्वनी<br>२२६२१०३१-३६<br>२२६२१००६<br>२२६२६७४० | Website : http://maha-arogya.gov.in[<br>Email : ddhsnursingmumbai@gmail.com<br>Email : ddhsnursing.dhs-mh@mah.gov.in |
| | | क्र.संआरो/शुश्रृषा/कक्ष-९/टे-४/NPME/अर्ज मागविणे/ 1781-1791 /२४<br>दि.२६/०२/२०२४ |

प्रति,

उपसंचालक,

आरोग्य सेवा (सर्व ............)

विषय - नर्स प्रक्टिशनर मिडवाईफरी (NPM) एज्युकेटर प्रशिक्षणाकरीता इच्छुक उमेदवारांकडून अर्ज मागविण्याबाबत..

संदर्भ -१. सचिव, कस्तुरबा हेल्थ सोसायटी, वर्धा यांचे पत्र दि.२.२.२०२४

२. राज्य कुटुंब कल्याण कार्यालय, पुणे यांचे पत्र दि.१०.४.२०२३

३. मा. अतिरीक्त संचालक (कु.क) , पुणे यांचेसोबत आयोजित व्ही.सी. दि.०४.०१.२०२४

४. आयुक्तालयाचे पत्र क्र.संआरो/शुश्रृषा/कक्ष-९/टे-४/NPME/अर्ज मागविणे/ ७६४-७३/२४ दि.१६.२.२०२४

उपरोक्त् विषयांकित प्रकरणी, आयुक्तालयाच्या संदर्भ क्र.४ च्या पत्रानुसार माता व बालकांना सेवा देण्याची आवड असणा-या व भविष्यात महाराष्ट्रमध्ये आरोग्य विभागाच्या सुरु असलेल्या अथवा प्रस्तावित कोणत्याही State Midwifery Training Institute(SMTI) मध्ये सदर प्रशिक्षणाचा उपयोग करुन सेवा देण्यास तयार असणा-या सेवांतर्गत व पाच वर्षाचा माता व बाल रुग्णसेवेचा अनुभव असणा-या व शैक्षणिक अर्हता धारण करणा-या अधिपरिचारीका यांचे कडुन संस्थेचे नाहरकत प्रमाणपत्र (NOC) घेवुन एकत्रित अर्ज परिमंडळनिहाय आयुक्तालयास दि.२३.०२.२०२४ पुर्वी पाठविण्याबाबत कळविण्यात आलेले आहे.

तथापि अद्यापपर्यंत पुरेशा प्रमाणात अर्ज प्राप्त झालेले नसल्याने संदर्भ क्र. ४ च्या पत्रामध्ये नमूद केल्यानुसार नर्स प्रक्टिशनर मिडवाईफरी (NPM) एज्युकेटर प्रशिक्षणाकरीता इच्छुक उमेदवारांकडून अर्ज दि.५/४/२०२४ पर्यंत आयुक्तालयास सादर करण्यात यावेत.

(सोबत- संदर्भ क्र. ४ च्या पत्राची छायांकित प्रत)

Nilima
26/3/2024

(डॉ.निलीमा सोनावणे)

सहा.संचालक (शुश्रूषा)आरोग्य सेवा मुंबई.

प्रत - प्राचार्य, कस्तुरबा नर्सिंग कॉलेज (NMTI), वर्धा

प्रत - मा. अतिरीक्त संचालक (कु.क)राज्य कुटुंब कल्याण कार्यालय, पुणे.

# आरोग्य सेवा आयुक्तालय

(महाराष्ट्र राज्य)

"आरोग्य भवन", सेंट जॉर्जेस रुग्णालय आवार, पी.डिमेलो रोड, मुंबई- ४०० ००१



| | | |
|---|---|---|
| कार्यालय<br>संचालक (वैयक्तिक)<br>उपसंचालक (शुश्रषा) | दूरध्वनी<br>२२६२१०३१-३६<br>२२६२१००६<br>२२६२६७४० | Website : http://maha-arogya.gov.in[<br>Email : dhs_2005@rediffmail.com<br>Email : miscell@rediffmail.com<br>Email : ddhsnursingmumbai@gmail.com |
| | | क्र.संआसे/शुश्रृषा/कक्ष-९/टे-४/NPME/अर्ज मागविणे/ 764-73 /२४<br>दि.16/०२/२०२४ |



प्रति,

उपसंचालक,

आरोग्य सेवा (सर्व ............)

विषय - नर्स प्रक्टिशनर मिडवाईफरी (NPM) एज्युकेटर प्रशिक्षणाकरीता इच्छुक उमेदवारांकडून अर्ज मागविण्याबाबत..

संदर्भ -१. सचिव, कस्तुरबा हेल्थ सोसायटी, वर्धा यांचे पत्र दि.२.२.२०२४

२. राज्य कुटुंब कल्याण कार्यालय, पुणे यांचे पत्र दि.१०.४.२०२३

३. मा. अतिरीक्त संचालक (कु.क) , पुणे यांचेसोबत आयोजित व्ही.सी. दि.०४.०१.२०२४

माता आणि बालकास आदरयुक्त व उच्च दर्जाची सेवा पुरविण्याकरीता केंद्र शासनाच्या मार्गदर्शक नियम नियमावलीनुसार नर्स प्रक्टिशनर मिडवाईफरी (NPM)एज्युकेटरप्रशिक्षण हे १८ महिन्याचे असुन ६ महिने निवासी प्रशिक्षण आणि १२ महिने Onsite Mentorship कार्यक्रम मुख्यत्वे कौशल्यावर आधारित आहे.

सदर प्रशिक्षण हे National Midwifery Training Institute,Kasturba College of Nursing, Wardha येथे प्रस्तावित आहे.त्याकरिता आपल्या अधिपत्याखालील माता आणि बालकांना सेवा देण्याकरिता इच्छुक अधिपरिचारीकांकडुन अर्ज मागविण्यात येत आहे. सदर उमेदवारांची शैक्षणिक अर्हता खालील प्रमाणे असावी

१) PBBSc / BSc Nursing (RNRM) आणि २ वर्षाचा क्लिनिकल अनुभव असावा.

२) MScNursing (OBGY / CHN/Paediatric Nursing) आणि २ वर्षाचा क्लिनिकल अनुभव असावा.

३) उच्चतम वयोमर्यादा ४५ वर्षे.

४) महाराष्ट्र परिचर्या परिषदेचे नोंदणी व नुतणीकरण प्रमाणपत्र असावे.

५) सेवांतर्गत उमेदवारांना ५ वर्षाचा माता व बाल आरोग्य विभागात काम केल्याचा अनुभव आवश्यक आहे.

निवड प्रक्रिया: १०० गुणाची प्रवेश परिक्षा घेण्यात येईल

भाग-१:

१) लिखित परिक्षा ४०%

२) OSCE-२०%

भाग-२ :मुलाखत (४०%)

१) Motivational Screening (२०%)

२) Aptitude Assessment (२०%)

यास्तव, माता व बालकांना सेवा देण्याची आवड असणा-या व भविष्यात महाराष्ट्रामध्ये आरोग्य विभागाच्या सुरु असलेल्या अथवा प्रस्तावित कोणत्याही State Midwifery Training Institute(SMTI) मध्ये सदर प्रशिक्षणाचा उपयोग करुन सेवा देण्यास तयार असणा-या सेवांतर्गत व पाच वर्षाचा माता व बाल रुग्णसेवेचा अनुभव असणा-या व शैक्षणिक अर्हता धारण करणा-या अधिपरिचारिका यांचे कडुन संस्थेचे नाहरकत प्रमाणपत्र (NOC) घेवुन एकत्रित अर्ज परिमंडळनिहाय कार्यालयास दि.२३.०२.२०२४ पुर्वी पाठविण्यात यावेत.

तसेच सदर उमेदवाराने प्रशिक्षणानंतर सेवा देण्यास असमर्थता दर्शविल्यास अशा उमेदवाराकडुन प्रशिक्षण काळातील शासनाने अदा केलेल्या वेतनाची वसुली करण्यात येईल.

(सोबत NPMEबाबत माहिती व अर्जाची प्रत जोडण्यात येत आहे.)

( डॉ.नागनाथ मुंदम )

उपसंचालक ( शुश्रुषा )आरोग्य सेवा पुणे.

प्रत - प्राचार्य, कस्तुरबा नर्सिंग कॉलेज (NMTI), वर्धा

प्रत - मा. अतिरीक्त संचालक (कु.क)राज्य कुटुंब कल्याण कार्यालय, पुणे.